MARATHI

# ते छायाचित्र कुणी काढलं?




नन्दिता ड कूना
रेखाचित्रं : प्रिया कुरियन
अनुवाद : सुजाता देशमुख

एकलव्य

# ते छायाचित्र कुणी काढलं?

*Vah Photo Kisne Khinchi?*

कथा : नंदिता ड कूना
रेखाचित्रं : प्रिया कुरियन
अनुवाद : सुजाता देशमुख

मराठी अनुवाद : एकलव्य फाउंडेशन, सितम्बर २०२३
लेखन : नंदिता डिकुन्हा
हे पुस्तक Attribution-Non-Commercial-NoDerivatives 4.0 International (CC BY-NC-ND 4.0) लायसन्सच्या अंतर्गत आहे ज्याचे विवरण https:creativecommons.org/licecses/by-nc-nd/4.0/ वर उपलब्ध आहे.

वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या पुस्तकाचा कोणताही बदल न करता उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखक आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कुठल्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखकांशी अवश्य संपर्क करा.

रेखाचित्रं : प्रिया कुरियन, सितम्बर २०२३
मूळ पुस्तक आणि त्याचा अनुवाद यांच्याकरता टाटा ट्रस्टच्या पराग इनिशिएटिव्हचे साहाय्य लाभले आहे.

पहिली आवृत्ती : सितम्बर २०२३ (2000 प्रती)
कागद : १०० जीएसएम मॅट आर्ट आणि मुखपृष्ठ 220 एफएफबी बोर्ड
ISBN : 978-81-963643-7-3
मूल्य : ₹ 55.00

हे पुस्तक इंग्रजीमध्ये *Who clicked that Pic?* आणि हिंदीमध्येही *वह फोटो किसने खींची?* नावाने , इकतारा ट्रस्ट, भोपाळ यांची मुद्रा असलेल्या जुगनू प्रकाशनने प्रकाशित केले आहे

एकलव्य फाउंडेशन
जमनालाल बजाज परिसर
जाटखेडी, भोपाळ 462 026 (मध्य प्रदेश)
Phone: +91 755 297 7770-71-72
Website: www.eklavya.in; Email: books@eklavya.in

मुद्रक : आर के सिक्युप्रिंट प्रा लि, भोपाल; फोन: +91 755 268 7589

# ते छायाचित्र कुणी काढलं?

नन्दिता ड कूना

रेखाचित्रं : प्रिया कुरियन

अनुवाद : सुजाता देशमुख




एकलव्य

प्रेरणा : होमाई व्यारावाला यांचं स्फूर्तिदायी जीवन.

“परी!” आई हाक देते.
“अगोदर तुझा तो
कॅमेरा बाजूला ठेव
आणि दांत घासून घे
बघू! फोटो काढण्याच्या
नादात पुन्हा शाळा
बुडवायची आहे का?”



“आई, आज सुट्टी. गणेश चतुर्थी. गणपती बाप्पा मोरया!” मी खुदूखुदू हसत आईला म्हणते.

मी परवेझला उठवते. आजचा दिवस भलताच गडबडीचा असणार आहे. सणासुदीच्या धमाल फोटोंसाठी श्रीयुत नखरावालांच्या वर्तमानपत्राकडून अख्खा एक रुपया मिळतो. मी तो रुपया मिळवणार म्हणजे मिळवणारच. त्यातून काय विकत घ्यावं, या विचारानंच माझं डोकं हवेत तरंगायला लागतं.

“सिनेमाची तिकिटं?” परवेझ विचारतो.

“नाही! फोटोच्या फिल्मची नवी रिळं घेणार आहे मी. कॅमेऱ्यात शेवटचा रोल उरलाय.” त्याला मी म्हणते.

उत्तम फोटो मिळवण्यासाठी मग आम्ही दोघं सायकली काढतो.

परवेझ माझ्या हातून कॅमेरा हिसकावून घेतो आणि कसला फोटो काढतो माहितीये?



“अगं, जरा हास की! तुला आवडला नाही?” तो विचारतो.

त्याच्या हातातनं माझा कॅमेरा ओढून घेत मी “नाही” म्हणते.

माझ्याकडच्या रिळात दहा फोटोंची जागा होती. आता नऊ उरलेत.

रस्त्यांवर सणासुदीचं मंगलमय वातावरण आहे. शेंगदाणेवाले, पोरासोरांना हातचलाखी करून दाखवणारे फिरताहेत. बरोबरीनं मदाऱ्यांच्या माकडांचाही उच्छाद सुरू आहे, आणि असं बरंच काही.

मी चपळाई करते, आणि तरी ऊप्स !

मी कशाचा फोटो काढला, काही कल्पना येतीये?



“एsss माकडा, माझे शेंगदाणे!” पहिला शेंगदाणेवाला ओरडतो.
“माझंय ते माकड! त्याचा काढू शकशील?” दुसरा ओरडून विचारतो.
“नाही!” मी.
जाऊदे. काही बिघडलं नाही. माझ्याकडे अजून आठ फोटोंची जागा आहे.

ही मिरवणूक मस्त रंगीबेरंगी आहे. नाचणारेही जोशात आहेत. माझे हात पटापट चालतात. पण माझ्या फोटोत काय डोकावतं माहीत आहे? काही अंदाज?



“बेटी, पेढा खाणार?” नाचणारा एकजण विचारतो.

“नको”, मी म्हणते.

उफ्! सातच फोटो उरलेत.

पोरं उत्स्फूर्त आनंदानं किंचाळत, खिदळत उड्या मारताहेत

मी पटकन कॅमेरा सरसावते.
मला काय मिळतं, माहितीये?



“हीsssss” पोरं दांत विचकून चिडवतात. “ओ ताई, आणखी एक, आणखी एक काढा ना..”

“नाही.” मी म्हणते.

मी माझी साडी वर खोचून घेते. अजून सहा फोटो शिल्लक आहेत.

टांगे, ट्रॅम गाडीचे रूळ आणि माझ्या मागे ‘पांsssव-पांप’ करत येणारी एक गाडी या सगळ्यांना मी चुकवत जाते. रस्त्यांवर नुसता गोंधळ सुरू आहे.


पण मी कशाचा फोटो काढते, आहे कल्पना?



मी धडपडते, तशी माझ्या पोलक्याची बाहीच फाटते. असंच उलटपावली जावं का घरी परत? नकोच!
त्यापेक्षा मी दुसरी बाहीच फाडून काढते.
शांत हो. मी मलाच बजावून सांगते. अजून पाच फोटो शिल्लक आहेत.
वाराही खट्याळ झालाय. ढोलकी आणि नगारे परस्परांशी स्पर्धा करताहेत.

मी चपळाई करते, पण कॅमेऱ्यात येतं ते हे...








"अहो बाई, तुम्ही हा फोटो छापणार?" ढोलकीवाला विचारतो. त्याचा फेटा आणि टोप त्याला परत करता करता मी "नाही" असं सांगते. आता मात्र माझीच नखं मी चावते आहे, कारण अजून फक्त चार फोटोच शिल्लक राहिलेत.

परवेझला बाजूला एक रिकामी खुर्ची दिसते. त्यावरून जास्त चांगलं दिसतंय.

मी खुर्चीवर चढते खरी पटकन,

पण मिळालं काय माहितीयि चटकन?



खुर्चीचा मालक रागारागानं बघतोय. “माझ्या खुर्चीवर उभी आहेस?”
“नाही,” मी उत्तरते. अस्वल कुठला!
आम्ही पायडल मारतोय, तशी माझी सायकल आणि पोट, दोन्ही डचमळतंय.
अजून तीन फोटो शिल्लक आहेत...

पण मी काय काढते ते माहीत आहे?
अहा. काय सुंदर मूर्ती आहे ही. सगळेचजण
थांबून थांबून डोळे फाडफडून बघताहेत.
मी पटकन तिच्यावर कॅमेरा रोखते,

पण मला काय मिळतं, ठाऊक आहे?



“तुझ्याकडे कॅमेरा कसा? तू मॉडेल आहेस?”

“माझ्या कॅमेऱ्याचं भिंग जादूचं आहे. फोटो काढला, तरी जे मूर्ख असतात ते यात दिसतच नाहीत. तुम्ही दिसताय का, हे तुमचा फोटो काढून बघायचा का?” मी विचारते.

“नकोsss” ते एकजात किंचाळतात.

अजून दोन फोटो शिल्लक आहेत...

आईच्या चरख्यावरच्या सूत कताईसारखी माझ्या फोटोंची कहाणी मला विणता येईल. पण आता तिनं चरखाच विकून टाकलाय. मग माझ्या कॅमेऱ्याची रिळं कोण विकत घेऊन देईल मला? तो रुपया मिळवायलाच हवा! मला गरज आहे त्याची.

माझी उंची वीस फूट हवी होती. म्हणजे मला सगळं दिसलं असतं. आहा... ती बाल्कनी रिकामी दिसतीये, कुणीच नाहीये तिथे.

“सुरक्षित असेल ना तिथे जाणं?” परवेझ विचारतो.




मी उड्या मारतच जिना चढते.





खाली फेटे आणि टोप्या, ढोलकी आणि धोतरं,
टोपल्या आणि पालख्या
यांच्या लाटा उसळलेल्या असतात.


हे नजरेत भरायला पुरेसं असेल? नाही!
नऊ फोटो वाया गेले. फक्त एक उरलाय!
माझ्या कानी एकदम गडगडाट येतो.



रप रप रप पावसाची पहिली सर येते, (माझ्या छातीतही पाखरं भिरभिरतात) तशी पोरं अत्यानंदानं उड्या मारतात.
सगळे एकजात आकाशाकडे नजर लावतात – आणि मी क्लिक करते, मला अफलातून फोटो मिळतो.
फोटो काढते न काढते तोच,


क्लिक! क्लिक! क्लिक!

असे आवाज माझ्या कानांवर पडतात.





आणि ते बघा... खाली छत्र्यांचा समुद्र पसरलाय.



मला आणखी एक धुडूम असा आवाज ऐकू येतो. ढगांची गर्जना?

“नको,” परवेझ ओरडतो. कुणीतरी आम्ही उभ्या असलेल्या बाल्कनीचं दार लावून घेतलंय.

आम्ही आरडाओरडा करतो. पण आमचा आवाज कुणालाच ऐकू येत नाही. मला बाहेर पडलंच पाहिजे!

माझा कॅमेरा नीट गुंडाळून मी इमारतीच्या भोवतीच्या बांबूंच्या सांगाड्यावरून उडी मारते.



मग मी परवेझला उतरायला हात देते.

परवेझ नेहमीच मला मदत करतो. त्याच्या नावानं मी हा फोटो विकणार आहे.

माझ्यासारख्या एका मुलीनं हा फोटो काढला आहे हे
कळूनही जसा काही नखरावालांनी तो छापलाच असता!




रात्रभर जागून आम्ही दोघं फोटोंच्या प्रती काढतो.




मी शेवटी निवडलेला फोटो नखरावालांना पसंत पडेल?

ते फोटोकडे बघतात. ‘मिरवणूक – फोटो सौजन्य परवेझ मिस्त्री’
असा आम्ही मथळा सांगताच ते जोरात गुरगुरतात.
“नाही!”




अरे, ते काय दाखवताहेत? ओह ओह.
फोटोत, खालच्या मिरवणुकीकडे
कुणीतरी  वाकून बघतंय..

“तुमच्या दोघांची अशी हिंमत झालीच कशी?” नखरावाला म्हणतात.
मग शरणागती पत्करत मी सगळी कबुली देते, खूप बडबड करते, हात जोडते, पण-
“निघा! काय करायचं ते मी बघेन.”

दुसऱ्या दिवशी सकाळी आईची मोठ्यानं हाळी ऐकू येते – “परीssssss!”
तक्रार करायला नखरावाला आले की काय? नाही नाही!
आई विचारते – “ही माझी परी की काय? चक्क पहिल्या पानावर?”






मी पण आनंदानं आरोळ्या ठोकतेय, असं माझ्या लक्षात येतं.
मी हवेतल्या हवेत मूठ आवळते आणि म्हणते - “यांव! ”

# होमाई व्यारावाला (१९१३-२०१२)
# भारताची पहिली महिला छायाचित्रकार / पत्रकार.

या काल्पनिक गोष्टीमागे, होमाई व्यारावाला नावाचं एक अद्भुत रसायन असणाऱ्या स्त्रीचं प्रेरणादायी कर्तृत्व आहे. बायकांनी व्यावसायिक छायाचित्रं काढायची ही कल्पनाच मान्य नसणाऱ्या काळात, होमाई भारतातली पहिली छायाचित्रकार / पत्रकार झाली.

गुजरात राज्यातल्या नवसारी इथे, एका पारंपरिक पारशी कुटुंबात होमाईचा ९ डिसेंबर १९१३ ला जन्म झाला. एका फिरत्या नाटक कंपनीत होमाईचे बाबा नट होते. त्यामुळे ती वाढली मात्र मुंबईत.

घरच्या खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरिता तिची आई, पारशी समाजात मुलींनाही घातलं जाणारं पवित्र जानवं – कश्ती – चरख्यावर विणायची. होमाईचा माणेकशा नावाचा मित्र होता. त्याच्याकडून छायाचित्रणाची कला ती शिकली. पुढे तिनं माणेकशा यांच्याशीच लग्न केलं.

अगदी सुरुवातीला, मुंबईतल्या वैविध्यपूर्ण अठरापगड जातिधर्मांच्या रहिवाश्यांच्या व्यवसायांचे आणि सणांचे फोटो ते काढत असत.

त्यानंतर मात्र तिची कारकीर्द उत्तरोत्तर बहरत गेली. 'ब्रिटिशांचा भारत ते स्वतंत्र भारत' असा बदलांचा प्रवास दाखवणारी विपुल छायाचित्रं तिनं काढली. पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून ते अमेरिकेच्या तत्कालीन जॉन केनेडी या राष्ट्राध्यक्षांच्या पत्नी जॅकलीन आणि इंग्लंडच्या महाराणी एलिझाबेथ यांच्यापर्यंत, अनेक नामवंत व्यक्तींची छायाचित्रं तिनं काढली. याशिवाय अनेक ऐतिहासिक प्रसंगही होमाईनं आपल्या कॅमेऱ्यात चित्रबद्ध केले. तिच्या देदीप्यमान कामगिरीबद्दल २०११ साली तिला 'पद्मविभूषण' किताबानं गौरवण्यात आलं.

तिच्या प्रत्येक छायाचित्रामागे एक कथा असायची. आमच्या कथेमागच्या कथाही आम्हाला सांगायला आवडतील.

**अरे – तो सज्जा बघ, मोकळाच आहे**

छायाचित्राची अचूक वेळ गाठण्यासाठी आपल्या पाठंगुळीला नऊ किलो कॅमेऱ्याचं ओझं लटकावून होमाई सायकलवर टांग टाकून रस्तोरस्ती भटकत असे. 'बॉम्बेतली गणपती मिरवणूक' या मथळ्याचं ते छायाचित्र तिनं मिरवणुकीच्या समोरच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून काढलं. तिच्याबरोबर तिचा भाऊ होमी होता. त्या इमारतीचं बांधकाम सुरू होतं. छायाचित्र काढल्यानंतर, जिन्याचं दारच कुलूपबंद झालंय, असं दोघांच्या लक्षात आलं. मग इमारतीच्या बांधकामासाठी बांधलेल्या बांबूच्या सांगाड्यावरून दोघं उतरली. तिच्याबरोबर परत कधीही न जाण्याची त्यावेळी होमीनं प्रतिज्ञा केली!

**हीsssss! ओ ताई आणखी एक काढा ना..?**

होमाईला लोकांचं लक्ष नसतांना, अकृत्रिम पद्धतीनं छायाचित्रं काढायला आवडायची. वास्तविक त्याकाळी स्टुडियोत जाऊन वेगवेगळ्या प्रकारे हावभाव करीत छायाचित्रं काढून घेण्याचा प्रकार फारच लोकप्रिय होता. पण होमाई मात्र उगीच कुणाला कृत्रिम वागायला सांगत नसे. सहज घडेल ते तिच्या कॅमेऱ्यात यायचं.

'मी धडपडले, तशी माझ्या पोलक्याची बाहीच फाटली...असंच उलटपावली जावं का घरी परत?'

दिल्लीला राष्ट्रपती भवनात एकदा कार्यक्रम सुरू असतांना वरून फोटो काढण्यासाठी होमाईनं हात वर करताच तिच्या पोलक्याची शिवण उसवली. आजूबाजूचे बघे हसले. होमाईनं शांतपणे ती बाही फाडून काढली, मग दुसरीही काढली आणि आपलं काम सुरू ठेवलं.

**अहो बाई. तुम्ही हा फोटो छापणार?**

ज्यांचं छायाचित्र काढलं आहे, त्यांचा खाजगीपणा ती कायम जपत असे. त्यांना नको असेल, तर ते छायाचित्र प्रकाशित होणार नाही हा विश्वास तिनं निर्माण केला होता. एकदा एका व्हिएतनामी नेत्याची दाढी, पंडित जवाहरलाल नेहरू खेळकरपणे ओढतांनाचं छायाचित्र तिनं काढलं. पुष्कळ दिवस तिनं ते प्रकाशित केलं नाही. आपल्या कारकिर्दीच्या सुवर्णकाळातच तिनं छायाचित्रणातून संन्यास घेतला. कोणाही व्यक्तीचा खाजगीपणा जपण्याची पत्रास न राखता, त्यांची छायाचित्रं घेण्यासाठी पाठलाग करणाऱ्या नव-छायाचित्रकारांच्या कामाची पद्धत तिला रुचली नाही.

**सगळे बघत राहतात. कॅमेरा? बाईच्या हातात?**

होमाईला नर्मविनोदबुद्धी होती. ती पुष्कळवेळा कामी येत असे. कॅमेरा हातात घेतलेल्या होमाईला पाहून कुणीतरी, 'आता काय हजामतसुद्धा का?,' असा कुत्सित प्रश्न विचारताच तिनं, 'हो, तुमची करायची आहे?' असं उत्तर दिलं होतं.

**माझ्या छातीतही पाखरं भिरभिरतात – आणि मी क्लिक करते – घटनेच्या आधीचा तो एकच क्षण..**

कमालीचा निर्धार आणि संयम बाळगून होमाई त्या एका क्षणाची वाट पाहत असे. मग आणखी थोडी.. तिला हवं ते मिळेपर्यंत. तिच्याच शब्दांत सांगायचं झालं, तर 'तुम्ही तो क्षण पकडता, नाहीतर तो निसटतोच!'



**'वूडन स्पीड ग्राफीक पेस मेकर' सहित होमाई.**
**(छायाचित्र सौजन्य : एचव्ही अर्काइव्ह / अल्काझी यांच्या छायाचित्रं संग्रहातून.)**

**माझ्यासारख्या एका मुलीनं तो फोटो काढलेला आहे हे माहीत असूनही जसा काही त्यांनी तो छापलाच असता!**

छायाचित्रकार/ पत्रकार बाई ही गोष्टच मुळी ऐकिवात नव्हती. त्यामुळे होमाईची आधीची छायाचित्र तिच्या नवऱ्याच्या, म्हणजे माणेकशाच्या नावावर प्रकाशित झाली आहेत.

**अखेर, मी निवडलेला फोटो... ते शेजारी कोण डोकावून बघतंय?**

निरनिराळ्या ठिकाणी जातांना होमाई आणि माणेकशा एकच कॅमेरा वापरत असत. एखादं छायाचित्र नेमकं कुणी काढलंय, यावर वाद टाळण्याची होमाईची एक नामी युक्ती होती. आपल्या छायाचित्रात ती गुपचूप माणेकशा येईल असं बघत असे. म्हणजे छायाचि-त्र कुणी काढलंय ते आपसूक सिद्ध व्हावं.


---

संदर्भ : वृत्तपत्र बातम्या, वृत्तपत्रातल्या मुलाखती, सबीना गादीहोक यांच्या 'इंडिया इन फोकस : कॅमेरा क्रॉनिकल्स ऑफ होमाई व्यारावाला' या संग्रहातून आणि अनिक घोष यांच्या 'होमाई व्यारावाला' या माहितीपटातून.




**होमाई व्यारावाला – बॉम्बेतली गणपती मिरवणूक. १९३०च्या दशकाचा उत्तरार्ध. द्ध**

छायाचित्र सौजन्य : एचव्ही अर्काइव्ह / अल्काझी यांच्या छायाचित्रं संग्रहातून.



**होमाई व्यारावाला - १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर-जनरल म्हणून लॉर्ड माऊंट बॅटन यांचा शपथविधी झाला. या कार्यक्रमासाठी ‘राष्ट्रपती भवन’ ते ‘संसद भवना’पर्यंत काढण्यात आलेल्या औपचारिक मिरवणुकीचं हे छायाचित्र. ‘विजय चौका’त हे छायाचित्र घेण्यात आलं आहे.**

छायाचित्र सौजन्य : एचव्ही अर्काइव्ह / अल्काझी यांच्या छायाचित्रं संग्रहलयातून.

**नन्दिता ड कूना**

बालसाहित्यिक नंदिता डिकुन्हा मुंबईत राहतात. 'एक्सएलआरआय' इथून 'एमबीए'चं पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी काही काळ धोरण सल्लागार म्हणून काम केलं. त्यानंतर मात्र आपल्या सर्वात आवडीच्या बालसाहित्य लेखन क्षेत्रावर त्यांनी आपलं लक्ष केंद्रित केलं. चित्रकथा आणि गोष्टीरूप कथा अशी दोन्ही प्रकारची पुस्तकं त्यांनी लिहिली असून त्यांना मोठा वाचकवर्ग लाभला आहे. 'माय ट्रीप टू ला-ला लँड', 'जस्ट लाइक पपा', 'पेद्रू अँड द बिग बूम', 'द मॅजिक इन माय फिंगर्स' आणि 'द मिरॅकल ऑन सुंदरबाग स्ट्रीट' ही त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत.

'द मिरॅकल ऑन सुंदरबाग स्ट्रीट' या पुस्तकाला २०२१ सालचा 'उदयोन्मुख वाचक श्रेणी पुरस्कार' त्यांना मिळाला असून, 'फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'च्या प्रकाशन विभागातर्फे 'सर्वोत्तम बालसाहित्य' या श्रेणीतलाही पुरस्कार त्यांना मिळाला आहे. 'पराग, टाटा ट्रस्ट'च्या २०२१ सालच्या सन्माननीय बालसाहित्य यादीतही हे पुस्तक समाविष्ट आहे.

त्या पियानोवादक असून, लंडनच्या 'ट्रिनिटी कॉलेज ऑफ म्युझिक'च्या प्रमाणपत्र धारक आहेत.

nandita.dacunha@gmail.com





**प्रिया कुरियन**

प्रिया कुरियन या बालसाहित्यिक असून रेखाचित्रकार आणि व्यंगचित्रकारही आहेत. 'सिसम स्ट्रीट शो' ही प्रसिद्ध अमेरिकन दूरदर्शन मालिका होती. त्यावरून भारतीय 'सिसम स्ट्रीट शो' तयार करण्यात आली. त्यामध्ये शैक्षणिक चित्रपट प्रिया यांनी तयार केले. त्यांनी 'फिल्म सोसायटी ऑफ इंडिया' साठीही शैक्षणिक चित्रपट तयार केले असून, अनेक प्रकाशन संस्थांच्या बालसाहित्यासाठी रेखाचित्रं काढली आहेत. यात 'तुलिका बुक्स', 'कराडी टेल्स', 'एकलव्य', 'हार्पर कॉलीन्स', 'स्कोलास्टिक' आणि 'पेङ्गविन बुक्स' या प्रकाशन संस्थांचा समावेश आहे.

'द इंडियन एक्सप्रेस', 'द इंडियन क्वार्टरली' आणि 'द हिंदू बिझनेस लाईन' या नियतकालिकांमध्येही त्यांचं साहित्य आणि रेखाचित्रं प्रकाशित झाली आहेत.

भारतातल्या बालसाहित्यामधल्या त्यांच्या मोठ्या योगदानाबद्दल २०१९ साली 'पराग, टाटा ट्रस्ट'च्या वतीनं त्यांना 'बिग लिटल बुक अवॉर्ड' नामक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

त्या बंगळुरूच्या रहिवासी असून, फावल्या वेळात तिथल्या माणसांची व्यंगचित्रं काढायला त्यांना आवडतात.

priyakuriyan@gmail.com

## परीच्या कॅमेऱ्याच्या रिळात जपलेले फक्त दहा फोटो शिल्लक आहेत.. आणि आता आकड्यांची उतारमोजणी सुरू झाली आहे.. दहा, नऊ, आठ....

चला, आपण थोडंसं जुन्या काळात फेरफटका मारूया...

१९३०चं दशक...

कल्पना करा हं.. ब्रिटिशांच्या अमलाखालचं पारतंत्र्यातलं त्यावेळचं बॉम्बे. या शहरातल्या रस्त्यांवरून पाठीला नऊ किलोचा 'रोलीफ्लेक्स कॅमेरा' बांधून, सायकल मारत हिंडायचं म्हणजे काय असेल.

भारतातली पहिली महिला छायाचित्रकार/ पत्रकार होमाई व्यारावाला हे करायची. तिच्या वेगवेगळ्या कामगिरींमुळे प्रेरित होऊन ही मजेदार कथा रचण्यात आली आहे.



parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS

Big Little Book Award
Winning Illustrator

जुगनू
इकतारा ट्रस्ट की प्रकाशन छाप

मूल्य : ₹ 105.00

9 788196 364373

एकलव्य